सिडको / कार्मिक / २०१९/ दि. ०८.०४.२०१९

# परिपत्रक

**विषय:** ७ व्या वेतन आयोगाच्या अनूषंगाने वेतन निश्चिती करणे करीता विकल्प सादर करणे बाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग अधिसूचना क्र. वेपूर/२०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दि. ३०/०१/२०१९ अन्वये शासकीय कर्मचा-यांकरीता ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. शासनाने लागू केलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर सिडको महामंडळ ठराव क्र. १२१५४ दि. १८/०२/२०१९ अन्वये सिडको कर्मचा-यांस ७ व्या वेतन आयोग दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग अधिसूचना क्र. वेपूर/२०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दि. ३०/०१/२०१९ मधील नियम ६ नूसार द्यावयाचा विकल्प सोबत जोडलेल्या जोडपत्र ३ मधील नमून्यात लेखी दयावा लागेल. हा विकल्प सदर परीपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत म्हणजेच दि. २३.०४.२०१९ पर्यंत कार्मिक विभागास पाठविण्यात यावा, तसेच सोबत जोडलेले जोडपत्र ४ मधील नमून्यात बंधपत्र सादर करावे. विकल्पासंबधीची सुचना उपरोक्त नमुद केलेल्या कालावधीत मिळाली नाहीतर कर्मचा-याने दि ०१ जानेवारी २०१६ रोजी सादर व त्याच दिवसापासुन सुधारीत वेतन संरचनेची निवड केली आहे असे समजण्यात येईल. एकदा सादर केलेला विकल्प अंतिम असेल.

सर्व विभागप्रमूख / खातेप्रमूख यांना विनंती करण्यात येते कि वरील परिपत्रक ते त्यांच्या विभाग कर्मचा-यांच्या निर्दशनास आणून द्यावे.

व्यवस्थापक(कार्मिक)

सर्व विभागप्रमूख / खातेप्रमूख

प्रत माहीतीसाठी,

व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक

सह व्यवस्थापकीय संचालक १ यांचे स्वीय सहाय्यक

सह व्यवस्थापकीय संचालक २ यांचे स्वीय सहाय्यक

मुख्य दक्षता अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक

मुख्य प्रशासक(न.श) यांचे स्वीय सहाय्यक

**(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर २०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दिनांक ३० जानेवारी, २०१९ चे सहपत्र)**

जोडपत्र तीन

विकल्पाचा नमुना

[पहा नियम ६ (१)]

१. (अ) कर्मचाऱ्याचे नांव * श्री/श्रीमती/कुमारी ........................................................

(ब) धारण केलेले पद ................................................ * कायम/स्थानापन्न

(क) विद्यमान वेतन सरंचना : वेतन बँड पीबी-**..... रुपये.......... ग्रेड वेतन रुपये........

(ड) सुधारित वेतन सरंचना: वेतन स्तर एस-*** ...... .. रुपये.........

(ई) कार्यालयाचे नाव ........................................................................

२. मी * श्री/श्रीमती/कुमारी ................................................ ..................................

* (१) १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो/करते.

* (२) मी धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो / करते.

* माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.....

* माझे वेतन रुपये................. पर्यंत वाढवणाऱ्या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.

* मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही

दिनांक : नाव ....................................

---

**(केवळ कार्यालयाने भरावयाचे)**

प्रमाणित करण्यात येते की, * कायम / स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या * श्री /श्रीमती /कुमारी ............................................................................ यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही

दिनांक : नाव ....................................

कार्यालय प्रमुख ......................

*लागू नसेल ते खोडावे.

**वेतन बँड क्रमांक नमूद करावा.

***वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.

(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर वेपूर २०१९/प्र.क्र. १/सेवा-९
दिनांक ३० जानेवारी २०१९ चे सहपत्र)

जोडपत्र - चार
[पहा नियम ६ (२) (३)]

**वचन पत्र**

मी, ............................................................................ असे वचन देतो की, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील तरतूदींशी विसंगत वेतननिश्चितीच्या परिणामी किंवा पुढे वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून समायोजीत करून किंवा इतर प्रकारे शासनास परत करीन.

ठिकाण :
दिनांक :

सही
नाव ......................................
पदनाम.................................